# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## Grampanchayay

## TENDER DOCUMENT

**Name of work:** अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजना ग्रा.पं. कुसुंबे बु ता. रावेर जिल्हा जळगांव

## DISTRICT : JALGAON

Contractor | No. of Corrections | Executive Engineer

**महाराष्ट्र शासन**

**ग्रामविकास विभाग**

**ग्रामपंचायत कुसुंबे बु ता. रावेर जिल्हा जळगांव**

**ई-निविदा सूचन क्र.१ सन २०२५-२६ (प्रथम वेळ)**

**मा.सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत कुसुंबे बु ता. रावेर हे नोंदणीकृत पुरवठादार यांच्या कडून योग्य Item Rate Tender दोन लिफाफा पध्दतीने पुढील कामाची ई निविदा मागवीत आहे.**

| अ. क्र. | कामाचे नांव | आवश्यक वस्तुचे नाव | निविदा रक्कम रुपये | टेंडर फी रक्कम रुपये | आवश्यक ठेकेदार वर्ग | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजना** अंतर्गत **ग्रामपंचायत कुसुंबे बु ता. रावेर जिल्हा जळगांव सार्वजनिक शौचालय बांधकाम करणेसाठी साहित्य पुरवठा करणे** | ५३ ग्रेड OPC सिमेंट ISI Mark 50 K.G, And Steel TMT | - | - | दुकान परवाना | १२० दिवस |

१) सदर संपूर्ण ई निविदा प्रक्रीया द्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीद्वारे होईल. सदर निविदे संदर्भात निविदा नोटीस पध्दतीने, शुध्दी पत्रके इत्यादींची माहिती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२) वरील कामाची निविदा प्रपत्रे https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर निविदा प्रपत्रे, अटी व शर्ती इ. सदर संकेतस्थळावरुन **दिनांक १५/०५/२०२६ दुपारी ०५.०० ते दिनांक २१/०५/२०२६ दुपारी ५.००** वाजेपर्यंत अवधग्रवहत (Download) करता येईल.

३) वरील कामाची निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरु **दिनांक १५/०५/२०२६ दुपारी ०५.०० ते दिनांक २१/०५/२०२६ दुपारी ५.००** वाजेपर्यंत इलेक्ट्रॉनिकFormat मध्ये Online पध्दतीने सादर करता येतील.

४) ई निविदा अटी व शर्तीत बदल करणे, प्राप्त निविदांपैकी १ किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकरण्याचा हक्क निम्मस्वाक्षरीत यांनी राखून ठेविला आहे. ई निविदा भरणा-या कोणत्याही ठेकेदारास ई निविदेतील फेटाळल्या बाबत कोणतेही स्पष्टीकरण मागता येणार नाही. तसेच एखाद्या कामाची निकड लक्ष्यात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथिल करण्याचा हक्क व निम्मस्वाक्षरीत यांनी राखू ठेविला आहे

**५)** Onlineसादर केलेल्या **ई निविदा दिनांक २२/०५/२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजता** ग्रामपंचायत कार्यालयात घडण्यात येतील. सदर ई निविदा उघडणे शक्य न झाल्यास कार्यालयाच्या वेळेवर सोयीनुसार पुढील शक्य त्या दिवशी उघडणेत येतील. तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा उघडण्यात ३ तासांचा अवकाश असेल सदर कालावधीत एखाद्या पुरवठादारास काही निविदा संदर्भात काही अडचण, हरकत असल्यास त्यांनी सरपंच ग्रामपंचायत **कुसुंबे बु** ता. रावेर यांना लेखी स्वरुपात तक्रार देणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सरपंच यांचा निर्णय अंतीम राहील.

**६) योजनांचा निधी ग्रामपंचायतीस प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.**

**मा.सरपंच / ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत कुसुंबे बु ता. रावेर**

# ई निविदा संदर्भातील इतर अटी व शर्ती

१) साहित्य खरेदीपुरवठादारांनी दोन लिफाफा पध्दतीने ई निविदा सादर करणे गरजेचे आहे.

२) कंत्राटदारांनी कामाचे नकाशे निविदेतील अटी शर्ती बाब निहाय कामाचे स्थळ मंजूर सहित्यांची उपलब्धता या सर्व बाबींचा अभ्यास करुन निविदा सादर कराव्यात.

३) लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करुन लिफाफा क्र. १ मध्ये पात्र ठरलेल्या साहित्य खरेदीपुरवठादाराचा लिफाफा क्र. २ उघडणेत येईल.

४) कोणत्याही अटीवर आधारित असलेल्या ई निविदा स्वीकारल्या जाणार नाही अथवा स्विकारला तरीही त्या मंजूर केल्या जाणार नाहीत.

५) पुरवण्यात येणा-या सर्व साहित्यांचे रॅायल्टी, विक्रीकर, आयकर, जीएसटी व शासनाने ईतर उपकर व फी भरण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील तसेच साहित्य कामाच्या ठिकाणी पुरवठा दारास पोहच करन द्यावे लागेल व त्यातील कोण्त्याही नियमाच्या भंग झाल्यास दंड वा शिक्षेस पुरवठा धारक स्वत : जबाबदार राहील त्यामुळे BOQमध्ये साीीत्याचे दर सर्व करासहित विचार करुन नोंदवावे.

६) मंजुर निविदेतील साहित्यांचे दर निविदा मंजुर दिनांकापासुन ९० दिवसापर्यंत वैध राहतील. बाजारपेठेत सदर साहित्याचे दर वाढल्यास वाढीव दराची रक्कम ग्रामपंचायत देणार नाही.

७) सदर कामासाठी लागणार साहित्य हे शासनाच्या गुणवत्ता मानांकनाप्रमाणे असावे.

८) सदर कामाचा योग्य त्या तत्सम यंत्रणेकडील तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयक अदा करण्यात येईल.

९) अंदाज पत्रक दरापेक्ष कमी दराचा निविदा भरल्यास शासन निर्णय क्र. बिडीजी २०१६/प्र.क्र.२/ईमा.२/मंत्रालय मुंबई ४०००३२ दि. १२/०२/२०१६ व जि. प. स्थायी समिती ठरा क्र. ५७७ दि. ०५/०७/२०१६ नुसार १० टक्के पर्यंत कमी दर भरल्यास १ टक्के विशेष सुरक्षा ठेवी तसेच १० टक्केपेक्षा जेवढ्या दराने कमी आहे त्यांच्या प्रत्येक टक्क्यास १ टक्का (उदा. १४ टक्के कमी दर असल्यास १० टक्के पर्यंत १ टक्का वरील ४ टक्कास ४ टक्के असे एकूण ५ टक्के) रकमेची बँक गॅरंटी अताहाव धनाकर्ष **अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजना** किंवा ग्रामपंचायतच्या नावे ग्रामपंचायत **कुसुंबे बु.** ता. रावेर यांचे नावे विशेष सुरक्षा ठेवी म्हणून काढण्यात यावा व तो सरकारी बँक किंवा शेड्युल बँकेचा तसेच **कुसुंबे बु** ता. रावेर येथे देय असलेला असावा धनाकर्षवर MICR IFSCकोड नंबर असणे आवश्यक आहे निविदा स्विकृती समाप्ती दिनांकापासून ५ कार्यालयीन दिवसात ग्रामपंचायत **कुसुंबे बु** ता. रावेर यांचे कार्यालयात सदरचा धनादेश अथवा बँक गॅरंटी समक्ष लिफाफ्यामध्ये सिलबंद करुन जमा करावी. सदरच्या लिफाफ्यावर कामाचे नावे, ठेकेदाराचा पूर्ण व नोंद करावा विहीत मुदतीत ज्या ठेकेदाराचा धनादेश अथवा बँक गॅरंटी कार्यालयास प्राप्त होणार नाही अथवा चुकीचा धनादेश बँक गॅरंटी जमा केलेस अशा ठेकेदारांची भरलेली ई निविदा नामंजूर करण्यात येईल तसेच धनादेशाची मुदत निविदा भरल्याच्या क्रमांक नंतर क्रमांक ३ महिने पर्यंत असणे आवश्यक आहे तसेच सदरचा धनादेश हा ई निविदा प्रसिध्द झालेल्या दिनांकाच्या अथवा त्या नंतरचा असावा.

१०) निविदा मंजुर झालेल्या पुरवठा धारकास आदेश पत्र देण्यापुर्वी रुपये १००/- च्या मुद्रांकावर विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

११) पुरवठा धारकाने पुरविलेल्या साहित्याची देयके निधीचे उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील, मात्र कोणत्याही प्रकारचे अग्रीम दिले जाणार नाही.

१२) एकच अथवा सर्वच निविदा कारणे न देता अंशत : / संपुर्ण नाकारणेचा अधिकार सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत **कुसुंबे बु** ता. रावेर यांनी राखुन ठेवला आहे. त्याप्रमाणे निविदा का नाकारली याचा खुलासा देखील मागता येणार नाही.

१३) निविदा उघडणेपुर्वी साहित्याचा एक नमुना पुरविणेचा आहे. दर पत्रकात नमुद केलेल्या त्या साहित्याच्या तपशिलाप्रमाणे नमुना देणे बंधनकारक राहिल. नमुना न पुरविल्यास निविदा तांत्रिक मुल्यमापनातच रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीस असतील, तसेच निविदा मंजुरी नंतर नमुन्याप्रमाणे साहित्य पुरवठा केला नाही तर दिलेले आदेश रद्द करणेत येतील. याबाबत संबधीताची कोणतीच तक्रार विचारात घेतली जाणार नाही. नमुन्याप्रमाणे साहित्य न पुरविलेस सदर पुरवठाधारकाची रक्कम देण्यास ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही.

१४) निविदेला मंजुरी मिळालेनंतर मालाच्या पुरवठा करणेपुर्वी तयार असणारे साहित्य पुरवठादाराने कार्यालय सांगेल त्या दिवशी व त्या ठिकाणी दाखविणे ठेवले पाहिजे व ते नमुने प्रमाणे असल्याची खात्री झाल्यावर मालाचा पुरवठा आदेश मिळाल्यावर ३ दिवसाचे कालावधीत कामाच्या ठिकाणी स्वखर्चाने पोहच केले पाहिजे. ग्रामपंचायत कार्यालयाचे प्रतिनिधी साहित्याची तपासणी करतील व त्यावेळी पुरवठा दाराने निकृष्ट प्रतीच्या साहित्याचा पुरवठा केला असेल तर ते साहित्य ग्रामपंचायत स्विकारणार नाही व यामध्ये पुरवठा धारकाचे नुकसानीस ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. यानंतर साहित्य खरेदीस नविन निविदा प्रसिध्द केली जाईल. मुदतीत साहित्य पुरवठा न केलेस प्रतिदिन रुपये ५००/- दंडाची आकारणी केली जाईल. विलंबाने साहित्य पुरवठा केलेस दंडाची रक्कम बिलातुन वजा केली जाईल.

१५) निविदेबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत ग्रामपंचायत **कुसुंबे बु** ता. रावेर जो निर्णय घेईल तो निर्णय निविदा धारकास बंधनकारक राहील.

१६) निविदे सोबत जोडलेल्या कागदपत्रांचे सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

**अ) तांत्रिक लिफाफा / लिफाफा क्र. १**

- दुकान / संस्थेची नोंदणी केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत
  पुरवठा अथवा उत्पादकाचे पॅनकार्ड

**ब) तांत्रिक लिफाफा / लिफाफा क्र. २**

- ठेकेदारांनी आपले दर विहीत BOQ मध्ये त्या जागी भरणा करुन सदरची BOQ अपलोड करावी. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निविदेचे दर इतर कोठेही नमुद करु नयेत.
- पर फोर्मस सिक्युरिटी डिपोजीटचा केलेला डी.डी.

**मा.सरपंच / ग्रामसेवक**

**ग्रामपंचायत कुसुंबे बु ता. रावेर जिल्हा जळगांव**

Signature Not Verified
Digitally signed by Shabana Farid Tadavi
Date: 2026.05.15 12:33:58 IST
Location: Maharashtra-MH